
नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०८/२०२५ ( गुरूवार )**

---

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची उमरेड येथील शिवस्नेह गणेश मंडाळाला भेट

दिनांक २७/०८/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत शिवस्नेह गणेश मंडाळाला भेट दिली. सदर भेटीदरम्यान मा. पोलीस अधिक्षकांनी गणेश मंडळाचे पदाधिकारी यांच्यासोबत संवाद साधून त्यांना सुरक्षेबाबतच्या उपाययोजना, पोलिसांची मंडळाला भेट, तसेच सीसीटीव्ही कॅमेरे याबाबत विचारपूस केली तसेच त्यांच्या समस्यांची विचारपुस करून त्यांना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन गणेशोत्सव साजरा करण्याबाबत सुचना दिल्या. सदर वेळी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, यांच्यासह श्रीमती वृष्टी जैन, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक , प्रभारी पोलीस स्टेशन उमरेड, पोलीस स्टेशन उमरेड चे अधिकारी /अंमलदार आणि शिवस्नेह गणेश मंडाळाचे पदाधिकारी हजर होते.



## अवघ्या ४ तसात जबरी चोरीचा गुन्हा उघड, १ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड येथे फिर्यादी नामे नारायन कृष्णराव लाडे, वय ७५ वर्ष, रा प्लॉट क्रं ५०, विकास कॉलनी, उमरेड यांनी फिर्याद दिली की, दिनांक २७/०८/२०२५ रोजी सकाळी ०७:३० वाजेच्या सुमारास फिर्यादी हे घरातील कचरा टाकण्यासाठी घरा बाहेर गेले असता एका अज्ञात इसमाने मोटर सायकल वर फिर्यादीचे मागुन येवुन त्यांच्या गळयातील सोन्याचा गोफ हिसकावुन पळुन गेला. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अपराध क्रमांक ६४०/२०२५ कलम ३०४ भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद आहे.

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने तात्काळ सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून अवघ्या चार तासात दिनांक २७/०५/२०२५ रोजी सदर गुन्हयात आरोपी नामे **मनुसिंग**

**उर्फ जनरेलसिंग रामसिंग टाक, वय ४५ वर्ष, रा. समता नगर, नेरी दुर्गापुर, जि. चंद्रपुर** याला चंद्रपुर येथुन ताब्यात घेवुन त्याचे कडुन गुन्हातील चोरीला गेलेला १२.५४० ग्रॅम सोन्याचा गोफ किंमती १,००,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी आणि जप्त मुद्‌देमाल उमरेड पोलीसांना हस्तांतरीत करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक २८/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक केळवद पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिती मिळाली की, मध्य प्रदेश कडुन घुबडमेट मार्गे सावनेर कडे अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा झिल्पी शिवारातील लोहगट फाटा येथे नाकाबंदी केली असता पाढुर्णा कडुन स्कॉर्पीओ क्र एम.एच ३३/ए ४५१४ येतांना दिसली. पोलीस वाहन थांबविण्यास इशारा केला असता नमुद वाहन चालकाने वाहन न थांबविता पळ काढला. पोलीसांनी पाठलाग करून वाहन थांबवले आणि सदर वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगंधीत तंबाखु मिळुन आाला. **वाहन चालक आरोपी क्रं १) नामे मनिष मुरलीधर केवटे, वय ३७ वर्ष, रा. खडगाव रोड, वाडी नागपूर आणि त्याच्यासह गाडीत हजर असलेला आरोपी क्रं २) नामे तुषार उर्फ त्रिशूल सुरेश सिरसागर वय ३७ वर्ष रा. सोनबा नगर, वाडी नागपूर मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांचे ताब्यातुन १५ वेगवेगळया कंपनीचे १६२.९५८ किलोग्रॅम महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले अन्नपदार्थ/ प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १,६३,४५० /— रूपये, तसेच वाहन स्कॉर्पीओ क्र एम.एच—३३/ए ४५१४ किंमती १०,००,०००/—रूपये असा एकुण ११,६३,४५०/—रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती

असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**



## मोटर सायकल चोरीचे २ गुन्हे उघड, २ मोटर सायकल जप्त
## बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :–** पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत दिनांक २६/०६/२०२५ रोजी रात्री दरम्यान यातील फिर्यादी नामे शनी रूपदेव येरमे, वय ३३ वर्ष, रा. सातगाव, कन्हाळगाव ता.हिंगणा जि. नागपुर हा जेवन पार्सल घेण्या करीता पत्नीसह ईरा चौकात आला व पार्सल घेण्या करीता पत्नी ला थांबवून एम.आय.डी.सी चौकात मेडीसीन घेण्याकरीता गेला व रोडचे कडेला मोटर सायकल उभी करून दुकानात गेला असता कोणीतरी अज्ञात इसमाने मोटर सायकलचे हॅन्डल लॉक तोडून मो.सा. चोरून नेली आहे. असा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे अप.क. ६४५/२०२५ कलम ३०३(२) भा. न्या.स अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

श्री दिपक अग्रवाल, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग नागपुर यांनी सदर गुन्हयाचे तपासकामी एक पथक नेमन्याचे आदेश दिले त्यावरून पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले, प्रभारी अधिकारी, बुटीबोरी पोलीस स्टेशन यांनी गुन्हे प्रगटीकरण शाखेचे पथक गठीत केले. सदर पथकाला मुखबिरद्वारे अज्ञात आरोपी हा पो.स्टे मुल जि.चंद्रपूर हददीतील चेकेबंबाळ येथील असल्याची माहीती प्राप्त झाली. प्राप्त माहीती वरून सदर पथकाने आरोपी नामे छत्रपती सुरेश मांडवगळे, वय ३१ वर्ष, रा. चेकबेबाळ, पोस्ट भेजगाव ता.मुल जि. चंद्रपूर यास दिनांक २८/०८/२०२५ रोजी त्याच्या घरून ताब्यात घेवून गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच नमुद आरोपीला सखोल विचारपुस केली असता त्यांनी बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीतुन अजुन एक मोटार सायकल सीबी शाईन चोरी केल्याची कबुली दिली. पोलीसांनी पंचासमक्ष अप.क. ६४५/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.स गुन्हयात चोरीस गेलेली सी.बी. शाईन मोसा क्र एम.एच.४०बी. एस ८४३७ किमती ६५,०००/– रूपये आणि अप.क. ७८२/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.स मधील विनाक्रमांकाची ग्रे रंगाची सीबी शाईन मोसा किंमती ८०,०००/– रूपये असा एकुण १,४५,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **नमुद आरोपीला बुटीबोरी पोलीसांनी अटक केली आहे.**




## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ६२ गुन्हे नोंद एकुण २,११,९८६/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २७/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू,मोहाफुल सडवा असा एकुण २,११,९८६/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन अरोली (३ गुन्हे) —** आरोपी १) डेमन भैया तांडेकर, वय ५५ वर्षे, रा. तांडा ता. मौदा जि. नागपुर, २) रामेश्वर माधोराव उके, ४८ वर्षे, रा. धर्मापुरी, ता. मौदा जि. नागपुर आणि एक महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे . **पोलीस स्टेशन पारशिवणी (३ गुन्हे) —** आरोपी क्रं १) राजकुमार अंकुश धुर्वे, वय ४५ वर्ष, रा. अंबाझरी, ता. पारशिवनी, २) रमेश सदाशिव वरखडे, वय ६५ वर्ष ,रा. ईटगाव ता.पारशिवनी, जि.नागपूर, ३) रामलाल पंजाबराव गेडाम, वय ७० वर्ष, रा. मेहंदी तह. पारशिवनी जिल्हा नागपूर यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे . **पोलीस स्टेशन रामटेक (२ गुन्हे)—** आरोपी क्रं १) रविद्र ग्यानिराम परतेती, वय ३३ वर्ष, रा.न्यु फुलझारी संग्रमपुर, ता.रामटेक, २) संजय हरीदास धुर्वे, वार्ड क्र.०३, काचुरवाही

,रामटेक यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार (१ गुन्हा)—** येथे आरोपी राम सोमाजी कुंमरे वय ४३ वर्ष रा. बोथीया पालोरा ता. रामटेक जि. नागपुर आरोपीवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा (१ गुन्हा) —** एका महीला आरोपीवर एक गुन्हा नोंद आहे **, पोलीस स्टेशन केळवद (६ गुन्हे) —** सहा महीला आरोपीतांवर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन कळमेश्वर (९ गुन्हे) —** आरोपी नामे १) अतुल रूपराव रामेकर वय ३६ वर्ष रा. निमजी खदान, २) आशिष कृष्णाजी वंजारी वय ३० वर्ष रा. वार्ड क्र. १० मोहपा, ३) तीर्थराज शंकर कडरेल वय ४३ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ फुटरी ,४) शंकरराव मानिकराव सलामे वय ५६ वर्ष रा. खैरी गोसाई, ५) मनोहर लक्ष्मण सावरकर वय ५० वर्ष रा. ब्राम्हणी, ६) धुरवास रामकृष्ण लाहबर वय ४६ वर्ष रा. सुसुन्द्री, ७) लहु काशीराम चिखले वय ५२ वर्ष रा. दहेगाव,८) बाबाराव भगवान कांबळे वय ६५ वर्ष रा. डोरली भिगारे ,९) एक महीला आरोपी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे **, पोलीस स्टेशन वेलतुर (१ गुन्हा) —** आरोपी नामे १) मुकेश चिंतामण नागोसे, वय ४१ वर्ष, रा. पचखेडी यांचे वर एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड (३ गुन्हे) —** येथे आरोपी नामे १) जयसिंग रामप्रसाद प्रसाद वय ७० वर्ष रा. गरडेपार ता.भिवापुर ,२) अनिकेत गोंविदा लोंखंडे, वय २७ वर्ष, रा. लिना ले आउट गिरड रोड उमरेड ,३) व्यकंट एलया बडगेवार ता उमरेड यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.**, पोलीस स्टेशन कुही (१ गुन्हा) —** येथे आरोपी नामे सुरेश रामचंद्र कामठे, वय ५५ वर्षे, रा भोला हुडकी मांढळ ता.कुही जि.नागपुर याचेवर एक गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन बेला (४ गुन्हे)—** येथे आरोपी नामे १) हरदिप हरनमसिंग तिलपितिया, वय ६५ वर्ष, रा. महालगाव, ता. भिवापुर,जि.नागपुर,२) प्रदिप वामनराव कावळे, वय ४५ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड जि. नागपुर, ३) गजानन किसनजी सडमाके, वय ४१ वर्ष, रा. कवडापुर, ता. उमरेड जि. नागपुर आणि एका महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन बोरी ( ६ गुन्हे ) —** येथे आरोपी नामे १) फिरोज गुलाम शेख, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र.०४, बुटटीबोरी, ता. जि. नागपुर ,२) नामदेव देवराव मरकाम, वय ७४ वर्षे, रा. तुमडी, ता. जि. नागपूर,३) राजु रामकृ श्णा वरकाडे वय ५७ वर्ष रा. तुमडी ता.जि. नागपुर, ४) रामचंद्र क्रिस्तीया वय ५६ वर्षे,गडमवार, रा. वार्ड क्रमांक ०६ आंबेडकर नगर त जि नागपुर आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे **,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी (१ गुन्हा)—** येथे आरोपी नामे मुकेश कंचन मरावी, वय २९ वर्ष, रा.टाकळघाट वार्ड क ०४ ता.हिंगणा जि.नागपुर याचेवर गुन्हा नोंद आहे. **, पोलीस स्टेशन मौदा (६ गुन्हे) —** आरोपी नामे १) गोंवीदराव केशवरावजी मातीखाये, वय ६५ वर्षे, रा.सावळी कामठी, २) मुन्नालाल भैययाजी साठवणे, वय ४५ वर्षे, रा. मांगली तेली, ता. मौदा ,३) शिवाशंकर उर्फ शिवा सुभाष धांडे, वय ३३ वर्षे, रा. पिपरी ता. मौदा , ४) शेखर रामु मोराडे वय ४४ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२ वडोदा, ५) टिकाराम किसन मारबते वय ६२ वर्षे, रा. कोटगाव ता. मौदा, ६) ज्ञानेश्वर त्रंबक वडे वय ५८ वर्षे,रा. कुंभारी ता. मौदा यांचेवर गुन्हा नोंद आहे **.पोलीस स्टेशन कन्हान (१ गुन्हा)—** येथे आरोपी नामे १) अमित नागोराव गजभिये वय ३० वर्ष रा. गोडेगाव,यांचेवर १गुन्हा नोंद आहे **, पोलीस स्टेशन नरखेड (१ गुन्हा) —** आरोपी १.मारुती लक्ष्मण उईके वय ३५ वर्ष रा. अंबाळा देशमुख,२. आशिष कोटजावळ रा.पिठोरी, यांचेवर १ गुन्हा नोंद आहे **,पोलीस स्टेशन जलालखेडा (७ गुन्हे)—** येथे आरोपी नामे १) सुधीर मोतीराम फाटे, वय ३८ वर्ष , रा. दावसा ता. नरखेड २) भानुदास तुकाराम सोनोने, वय ५८ वर्ष , रा. खरबडी ता. नरखेड, ३) रूपचंद्र आपाजी पवार, वय २९ वर्ष , रा. घोगरा ता. नरखेड, ४) केशरी उर्फ भानु रामचंद्र कछवा वय ४० वर्ष रा. परसोडी ता. नरखेड ५) रितेश रामशंकर कछवा, वय ३८ वर्ष, रा. परसोडी ता. नरखेड, ६) निलेश भास्करराव मेश्राम,वय ४४ वर्ष रा. इंदरवाडा ता. नरखेड ,७) किसना मारोतराव

टेकाम,वय ४४ वर्ष, रा. पिंपळगाव ता. नरखेड, यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे, **पोलीस स्टेशन काटोल (६ गुन्हे)—** येथे आरोपी नामे १) दिपसींग जोगेद्रसिंग भादा रा सादार मोहल्ला काटोल जि नागपुर, ,२) देवेन्द्र जर्नादन खरपुरिया रा डोंगरगाव काटोल जि नागपुर, ३) देवीशंकर उर्फ भोला नानाजी उईके, रा पेठबुधवार काटोल जि नागपुर, ४) जगदिश सुरज मारवाडी रा बाजबोडी ता काटरेल जि नागपुर,५) सौरभ प्रल्हाद येडमे वय २५ वर्ष रा. तांदुळवाणी रा ता काटरेल जि नागपुर, आणि एका महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १गुन्हा नोंद आहे.

**अशाआरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६२ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने